# जनसंपर्क अधिकारी


पोलीस आयक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार
यांचेकार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि.
ठाणेदुरध्वनीक्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेसनोट क्र-३३७/२०२४ दिनांक-०३/०९/२०२४.

## "सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व अंमलदार यांचा निरोप समारंभ"

मा. पोलीस महासंचालक, म.रा.मुंबई यांच्या संकल्पनेनुसार मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत ऑगस्ट २०२४ अखेरीस निवृत्त झालेले पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्या निरोप समारंभ कार्यक्रमाचे आयोजन दिनांक ३१/०८/२०२४ रोजी संवाद हॉल पोलीस मुख्यालय मिरा-भाईंदर, वसई-विरार येथे करण्यात आले होते.

नमुद कार्यक्रमामध्ये श्रेणी पोलीस उप निरीक्षक श्री. दिनकर विक्रम पाटील व सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक श्री. अनिल नारायण उतेकर यांचा सेवानिवृत्तीबाबत हार, शाल, श्रीफळ, मोमेन्टो व झाडाचे रोप देऊन सत्कार करण्यात आला. निवृत्त अधिकारी व अंमलदार यांच्या पत्नी यांना साडी भेट देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी सेवानिवृत्त अधिकारी व अमंलदार यांनी खात्यामध्ये कशाप्रकारे सेवा बजावणी केली व सेवेतील अनुभवाबाबत मनोगत व्यक्त केले.

नमुद कार्यक्रमामध्ये यावेळी सेवानिवृत्त अधिकारी यांचे कुटूंबिय, नातेवाईक, मित्रमंडळी तसेच मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय कार्यालयातील अधिकारी व अंमलदार उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे प्रस्तावित वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कैलास बर्वे मानवी संसाधन शाखा यांनी केले. कार्यक्रमास मा. श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त व मा. श्री. विजयकुमार मराठे, सहायक पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग, अतिरिक्त कार्यभार सहाय्यक पोलीस आयुक्त (मुख्यालय) हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कैलास बर्वे मानवी संसाधन शाखा यांनी मानले.




कार्यक्रम
वसई-विरार
आयुक्तालय
दिनकर विक्रम
सेवानिवृत्ती
हार्दिक


कार्यक्रम
वसई-विरार
विक्रम पाटील
पुढील
शुभेच्छा






----------------oooooooo----------------